# बृहन्मुंबई महानगरपालिका - शिक्षण विभाग
## सर्व शिक्षा अभियान

क्रमांक : सशिअ/2013-14/देदु/ 317
दिनांक : 4/3/14

प्रति,
विस्तार अधिकारी,
शहर साधन केंद्र क्र.1 ते 12.

### परिपत्रक

विषय : सन 2013-14 अंतर्गत देखभाल दुरुस्ती अनुदान निधी विनियोगाबाबत मार्गदर्शक सूचना.

संदर्भ : मप्राशिप/सशिअ/देखभाल दुरुस्ती /2013-14/1940 दि.16.05.2013.

(1) निकषानुसार पात्र शाळेत 3 किंवा कमी वर्गखोल्या असल्यास कमाल अनुदान रु.5000/-.

(2) जिल्ह्यासाठी सरासरी प्रत्येक शाळेसाठी रु.7500/- ही मर्यादा.

(3) इ.1ली ते 7वी शाळा असल्यास इ.1ली ते 4थी (प्राथ.) आणि इ.5वी ते 7वी (उच्च प्राथ.) अशी दोन स्वतंत्र शाळा समजाव्यात.

(4) शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वतःच्या इमारती असलेल्या शाळा आणि भाड्याच्या शाळा यांनाच सदर अनुदान देण्यात यावे.

(5) या अनुदानाचे वितरण हे शाळा संख्येनुसार न करता शाळेतील प्रत्यक्ष असलेल्या वर्गखोल्यांच्या संख्येनुसार करण्यात यावे.

(6) वर्गखोल्यांची संख्या गृहीत धरताना वर्गखोल्यांना प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनासाठी उपयोगात आणत असलेल्या वर्गखोल्यांची संख्या विचारात घेऊन (मु.अध्यापकांची खोली, स्वयंपाकगृह, ग्रंथालय खोली, शिक्षक कक्ष, संगणक कक्षासाठीच्या खोल्या वगळून) या अनुदानाचे वितरण करण्यात यावे.

(7) सदरचे अनुदान हे संबंधित शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर जमा करण्यात यावे.

(8) शाळा व्यवस्थापन समितीकडे निधी पोहोच झालेल्या दिनांकाची नोंद असणे आवश्यक आहे.

(9) सदरचा निधी खर्च करण्यापूर्वी संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने शाळेची गरज ओळखून नियोजन (ठराव) करावे व सदर निधीचा उपयोग करून [illegible] करावा.

(10) सर्व शिक्षा अभियानांतर्गत देखभाल दुरुस्ती अनुदानाचा उपयोग शाळेच्या अंतरंग व बाह्यरंग तसेच शाळेभोवतालच्या परिसर व शाळेच्या किरकोळ दुरुस्ती कामी करण्यात यावा.

(11) देखभाल दुरुस्ती अनुदानातून स्वच्छतागृहे कार्यान्वित करणे, संगणकाची किरकोळ दुरुस्ती करणे, वीज बील भरणा करणे, वीजेची उपकरणे इ. कामे करावीत.

(12) सदर अनुदान विनियोग झाल्यानंतर वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी (31/03/2014) उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने विस्तार अधिकारी-यांकडे सादर करावी.

(3) कालबाह्य न झालेल्या आवश्यक औषधांसह प्रथमोपचार पेटी अद्ययावत ठेवणे.

(4) शाळेतील प्रदर्शन फलकावर (display board) आवश्यक माहिती अद्ययावत ठेवणे. (उदा. शाळा व्यवस्थापन समिती बैठकीच्या नियोजित तारखा, प्राप्त निधी, शाळा व्यवस्थापन समितीचे निर्णय, पटनोंदणी इ.)

(5) शाळेच्या इमारतींच्या काही भागांचे रुपांतर अध्ययनाचे साधन म्हणून होईल अशा काही रचना करणे. उदा.

1. फर्निचरला वजनाचे स्टिकर चिकटविणे,
2. उंची मापक प्रत्येक वर्गात / कॉरिडॉरात लावणे.
3. खांबावर मीटर स्केल आखणे,
4. सापशिडी सारखे बैठे खेळ फरशीवर ऑईलपेंटने कायमस्वरुपी आखणे.

(6) घड्याळ, तक्ते, इतर शैक्षणिक साहित्य मुलांच्या डोळ्यांच्या पातळीवर लावणे.

(7) विषय कोपरे नव्याने तयार करणे / सक्रीय करणे, शोध कोपरा सुरु करणे

(8) मुलांच्या मुक्त अभिव्यक्तीसाठी फलक / इतर व्यवस्था.

(9) शालेय कामकाज, अध्ययन, शाळेबद्दल इतर अपेक्षा याविषयी विद्यार्थ्यांसाठी अभिप्राय पेटी ठेवणे.

सहा. कार्यक्रम अधिकारी (स.शि.अ.)

उपशिक्षणाधिकारी (विप्रशि/सशिअ)

अंधेरी (प) म. न. पा. माध्यमिक
इंग्रजी शाळा
अंधेरी (प) मुं. नं. ४०० ०५८.

प्रत कार्यवाहीसाठी
सर्व शाळेच मुख्याध्यापक
म न पा शाळा

खर्च करण्याची पध्दती खालीलप्रमाणे असेल.(SOP - Standard Operating Procedure).

| दुरुस्ती / कामाचे स्वरूप / वस्तूचे नाव | अंदाजित खर्च | अंतिम खर्च | | रु.1000/- पेक्षा जास्त असल्यास दरपत्रिका मागविण्याची पध्दत | | SMC मंजुरी | खरेदी प्रक्रिया कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु.1000/- पेक्षा कमी | रु.1000/- पेक्षा जास्त | ठराव | पूर्व मंजुरी | | | |
| तावदाने दुरुस्ती | | | | | | | | |
| दरवाजे / बेंचेस दुरुस्ती | | | | | | | | |
| प्लास्टर | | | | | | | | |
| स्वच्छतागृह | | | | | | | | |
| नळ दुरुस्ती | | | | | | | | |
| इलेक्ट्रीक दुरुस्ती व साधने | | | | | | | | |
| संगणक दुरुस्ती | | | | | | | | |
| कुंपन/संरक्षकभिंत | | | | | | | | |
| दरवाजे/खिडक्या रंगकाम | | | | | | | | |
| खडू/फळा | | | | | | | | |
| भितीतील कपाटे | | | | | | | | |
| उजेड हवेकरिता व्हेंटिलेटर्सची सोय | | | | | | | | |
| उतरता रस्ता | | | | | | | | |
| किरकोळ बदल | | | | | | | | |
| अध्ययन कोपरा | | | | | | | | |
| डस्टबिन (कच-याची टोपली) | | | | | | | | |
| हात धुण्यासाठी साबन | | | | | | | | |
| प्रथमोपचार पेटी | | | | | | | | |
| बालस्नेही अंतर्गत सुचविलेले उपक्रम | | | | | | | | |
| **दुरुस्ती नसल्यास** | | | | | | | | |
| घसरगुंडी, झोपाळा इ. वस्तूंची खरेदी | | | | | | | | |
| फ्लॉवर बेड तयार करणे | | | | | | | | |
| शाळेचे अंतरंग व बाहयरंग सजविणे | | | | | | | | |

NIL

शिक्षण हक्क कायद्याच्या परिपूर्तीसाठी आवश्यकतेनुसार खालील कार्यवाही देखभाल दुरुस्ती अनुदानातून करण्यात यावी.

(1) प्रत्येक वर्गात कच-याच्या टोपलीची उपलब्धता व तिचा नियमित वापर.

(2) स्वच्छतागृहांमध्ये हात धुण्यासाठी पाणी व साबण यांची व्यवस्था ठेवणे